# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**धारावी पुनर्विकास योजनेतंर्गत धारावी बस आगाराजवळ पीएमजीपी कॉलनीतील मोकळ्या भूखंडावर उभारलेल्या पथदर्शी इमारतीबाबत**

**(१) ७९२९ (०७-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी पुनर्विकास योजनेतंर्गत धारावी बस आगाराजवळ पीएमजीपी कॉलनीतील मोकळ्या भूखंडावर उभारलेल्या पथदर्शी (पायलट प्रोजेक्ट) इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीतील ३५८ सदनिकांसाठी पात्र रहिवाश्यांना सदनिका ताब्यात देण्यात आल्या आहेत काय, नसल्यास, पात्र रहिवाश्यांना सदनिका ताब्यात देण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(३) असल्यास, अद्याप भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) धारावी येथील “जे” क्लस्टर मधील एकूण ८५१ झोपडीधारकांपैकी प्रथम टप्यात ५२४ झोपडीधारकांपैकी २६६ निवासी झोपडीधारक पात्र आहेत यापैकी २६५ पात्र झोपडीधारकांना सी.एस.क्र.२/५०१ येथे धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारत क्र.१ मध्ये सदनिका वितरीत करण्यात आल्या असून दि.१०.०५.२०१६ रोजी प्रत्यक्ष सदनिकेचा ताबा देण्यात आला आहे. पात्र झोपडीधारकांपैकी एक झोपडीधारक मयत झाल्याने सदर झोपडीधारकास वितरीत करण्यात आलेला गाळा ताब्यात देणे शक्य झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मा.राष्ट्रपती महोदयांच्या दिनांक १७ जुलै, २००९ रोजीच्या बुलडाणा येथील दौरा कार्यक्रमासाठी केलेल्या कामांची थकित देयके व सुरक्षा रक्कम अदा करणेबाबत**

**(२) ९४२५ (०६-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.राष्ट्रपती महोदयांच्या दिनांक १७ जुलै, २००९ रोजीच्या बुलडाणा येथील दौरा कार्यक्रमासाठी केलेल्या रस्ते कामाची थकीत देयके व सुरक्षा रक्कम मिळणेबाबत बुलडाणा नगर परिषद यांचेकडून मा.सचिव नगरविकास विभाग यांना दिनांक ६ डिसेंबर, २०१४ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त थकीत देयक नगरविकास विभागाने त्वरीत अदा करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) रस्ता अनुदानाअंतर्गत बुलढाणा नगरपपरिषदेस सन २०१५-२०१६ मध्ये रु.५० लक्ष वितरीत करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे शहरातील अतिक्रमणांचा प्रश्न प्रलंबित असल्याबाबत**

**(३) १६५१२ (१०-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील अतिक्रमणांचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असून आता डी.पी.प्लॅन नुसार रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी ॲक्शन प्लॅन तयार झाला असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१६) :**(१) राज्यस्तरीय नगरोत्थान योजनेंतर्गत धुळे महानगरपालिका हद्दीत १६ रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. सदर रस्त्यांवरील अतिक्रमण काढणे आवश्यक असल्याने, त्याबाबत रस्त्यांचे मोजमाप करुन अतिक्रमण क्षेत्र मार्किंग करण्यात आले होते. त्यानुसार काही रस्त्यांवरील अतिक्रमणे महानगरपालिकेमार्फत काढण्यात आलेली आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सह्याद्री मित्रमंडळ मानखुर्द येथील रेल्वेच्या जागेवरील ६६ झोपड्याबाबत

**(४) १९६४० (११-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सह्याद्री मित्रमंडळ मानखुर्द येथील रेल्वेच्या जागेवरील ६६ झोपड्यावर रेल्वे संरक्षण भिंत बांधल्या पासून वारंवार कारवाई होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील झोपडीधारकांकडे गेल्या २० वर्षापासूनचे वास्तव्याचे सर्व पूरावे आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या पुनर्वसनासाठी रेल्वेने शासनाकडे दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१६) :**(१) व (२) रेल्वेच्या हद्दतील वारंवार होणारी अतिक्रमणे मध्य रेल्वेकडून निष्काशित केली जातात.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दौंड,(जि.पुणे) तालुक्यात मोठ्या प्रमाणावर हातभट्टया सुरू असल्याबाबत

**(५) २१९१८ (१०-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यात मोठ्या प्रमाणावर हातभट्टया सुरू असून दिनांक ४ मे, २०१५ वा त्या दरम्यान नांदूर व दहीटणे गावामधून सुमारे १२०० लीटर रसायने व गावठी दारू जप्त करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार छापे मारुनही अवैध दारूचे धंदे पुन्हा सुरू होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रामध्ये अवैध दारु धंद्याबाबतची माहिती मिळताच त्वरीत कार्यवाही करण्यात येते. सन २०१५ मध्ये दौंड तालुक्यातील यवत व दौंड पोलीस स्टेशन हद्दीतील दारुच्या धंद्याबाबत वेळोवेळी छापे टाकून ८८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत त्यामधील ९७ आरोपींना अटक करण्यात आली असून रु.१,५२,०३१/- किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.

नांदुर व दहीटणे गावात अवैध दारुच्या धंद्यावर कारवाईचे गुन्हे दाखल झालेले नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना नगरपालिकेने विविध संस्थांना भुखंडाचे वाटप केल्याबाबत**

**(६) २३७९९ (११-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना नगरपालिकेने विविध संस्थांना वाटप केलेल्या भूखंडापोटी नगरपालिकेस किती उत्पन्न मिळाले, त्या भूखंडाची सध्याची स्थिती काय अशा विविध बाबींचा शोध घेण्यासाठी उपमुख्याधिका-यांच्या नेतृत्वाखालील पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल सादर केला आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर अहवालात दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :**(१) जालना नगरपरिषदेने विविध संस्थांना वाटप केलेल्या भुखंडापोटी नगरपालिकेस रु.५०७३१८/- उत्पन्न मिळाले. उपमुख्याधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती, हे खरे आहे.

(२) होय.

जालना नगरपालिकेने ३५ संस्थांना भूखंड वाटप केले असून रस्त्याच्या कडेच्या १३ जागा भाडे तत्वावर देण्यात आल्या आहेत. सदर काही भुखंडाचे भाडेपट्टा संपुष्टात आलेले आहे. नगरपालिकेच्या १०२७ मालमत्ता असून त्यापैकी २०१ मालकीची आखिव पत्रिका उपलब्ध आहे. व ७/१२ २६ आहे. महाराष्ट्र शासनाच्या नावे १०३१ मालमत्ता आहेत. मुदत संपलेल्या भूखंडाच्या जागा ताब्यात घेण्याबाबत सर्वसाधारण सभेत विषय ठेवून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) भाडेपट्टा धारकांना भाडे भरण्याबाबत तसेच भाडेपट्टा संपलेल्या भुखंड धारकांकडून सदर जागा नगरपरिषदेच्या ताब्यात घेण्याबाबत सर्वसाधारण सभेत विषय ठेवून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती महानगरपालिकेची महत्वपूर्ण विषयांबाबत झालेली बैठक**

**(७) २४०६३ (१२-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती येथे अमरावती महानगरपालिकेच्या महत्वपुर्ण विषयांचे संदर्भात बैठक मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१ मे, २०१५ रोजी संपन्न झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीमध्ये अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे निकषांना शिथीलता देवून पुन:सर्व्हेक्षण करण्यात यावे अशी मागणी उपस्थित सदस्यांनी केली, अमरावती शहरातील बांधकामांना ०.३३ वाढीव चटई निर्देशांक देण्याचे संदर्भात निर्णय करण्यात आला तसेच अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या ४८.४९ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी प्रदान करुन निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावर उक्त प्रकरणी काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील दि. २१ मे, २०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार खालीलप्रमाणे निर्णय झाले आहेत.

अ) अमरावती भुयारी गटार योजना टप्पा क्र. १ उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी रु. २८.५२ कोटीच्या प्रस्तावास तातडीने मान्यता देणे हा संपूर्ण निधी एक वर्षात खर्च करणे.

आ) नगरोत्थान महाअभियान अंतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजना शासन अनुदान रु.३३.९५ कोटीच्या प्रस्तावास तातडीने मान्यता देणे हा संपूर्ण निधी एक वर्षात खर्च करणे.

इ) राजापेठ उड्डाणपुलाचे बांधकामाकरिता आवश्यक निधी रु.२५ कोटीच्या प्रस्तावास तातडीने मान्यता देणे व दोन वर्षात संपूर्ण निधी खर्च करणे.

ई) अमरावती मनपा क्षेत्रात ०.३० वाढीव एफएसआय अनुज्ञेय परंतु महापालिकेने तातडीने ठराव मंजूर करुन शासनास पाठवावा.

(३) उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात आल्या असून यातील,

अ) “ड” वर्ग महानगरपालिकांसाठीची प्रारुप नियमावली दि. १९/४/२०१६ रोजी प्रसिध्द झालेली असून, त्यात ०.३३ वाढीव चटई क्षेत्राचा मुद्दा समाविष्ट आहे. सदर नियमावली अद्याप अंतीम व्हावयाची आहे.

आ) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अमरावती शहराच्या रु. ११४.३५ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास शासनाने दिनांक २३/०६/२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

इ) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजूर अमरावती भुयारी गटार प्रकल्प व त्याच्याशी संबंधित कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने रु. २४.७५ कोटी इतका निधी मंजूर केला असून, त्यापैकी प्रथम हप्त्याचा निधी रु. १२.३८ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अ, ब व क वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात**
**अग्निशमन यंत्रणा स्थापन करण्याबाबत**

**(८) २५६२५ (१२-०८-२०१५). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अ, ब व क वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात तसेच मोठ्या शहरांच्या ठिकाणी संबंधित महापालिका व नगरपालिकामध्ये स्वतःची कार्यक्षम व सक्षम तसेच आवश्यक असलेल्या सामुग्रीसह अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित ठिकाणी कार्यरत असलेल्या अग्निशमन दलातील आवश्यक मनुष्यबळ, प्रशिक्षण, कामाच्या वेळा, अपुरे कर्मचारी, पुरेशी अत्यावश्यक व अत्याधुनिक यंत्रसामुग्री अपुरी असल्याबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(४) राज्यातील अग्निशमन विभागातील यंत्रणा बळकट करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :**(१) राज्यातील अ,ब व क वर्ग महानगरपालिकांकडे आवश्यक असलेल्या समुग्रीसह स्वत:ची कार्यक्षम अग्निशमन यंत्रणा उपलब्ध आहे. बहुतांशी नगरपालिकांकडे जुजबी अग्निशमन यंत्रणा आहे.
(२) व (३) "ड" वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायती यांच्या अग्निशमन सेवेतील तूट भरुन काढण्याकरीता व अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरीता महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. नव्याने अग्निशमन सेवा प्रस्थापित केलेल्या नगरपालिकांना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने प्रत्येक ६ मंजूर केली आहेत. तसेच नगरपरिषदांकरीता आस्थापना खर्चाची अट अग्निशमन विभागाकरिता शिथिल करण्यात आली आहे. महानगरपालिकांच्या अग्निशमन सेवेकरिता आवश्यक आकृतीबंधास शासनामार्फत मंजूर देण्यात येते.
(४) महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियानांतर्गत अग्निशमन केंद्र बांधणे व अग्निशमन वाहन खरेदी करणे यासाठी सन २००९ पासून अनुदार उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियान (जिल्हास्तर)( व वित्त आयोगामार्फत अग्निशमन वाहने व उपकरणे खरेदी करण्यासाठी नगरपालिका / नगरपंचायतीना अनुदान देण्यात येते.

---

## मुंबईतील म्हैशीचे तबेले इतरत्र हलविण्याबाबत

**(९) ३४३०७ (२१-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत या वर्षीच्या पावसाळ्यात लेप्टोस्पायरोसिस या आजाराची मोठ्या प्रमाणात लागण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा आजार उंदरामुळे झाला नाही तर तबेल्यातील म्हैशींच्या मलमूत्रातून पसरला असल्याचे केलेल्या पाहणीत आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आजाराचे सर्वाधिक रुग्ण जोगेश्वरी ते मालाड या परिसरात आढळून आले व याच परिसरात म्हैशीचे तबेलेही मोठ्या प्रमाणात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी म्हैशीचे तबेले इतरत्र हलविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे तसेच वरील आजार रोखण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(५) असल्यास, माहे नाव्हेंबर, २०१५ अखेरपर्यंत याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्या अंतर्गत साथरोग नियंत्रक कक्षात प्राप्त माहिती नुसार सन २०१५ मध्ये लेप्टो, या आजाराचे रुग्ण मागील वर्षाच्या तुलनेने वाढलेले आढळून आले.

(२) हे खरे आहे.

पशुसंर्वधन खात्याचे प्रतिनिधी व पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे अधिकारी यांच्या समन्वयाने घोडा, गुरे, कुत्रे व उंदीर इ. प्राण्यांचे रक्तनमुने बंगलोर व चैन्नई स्थित प्रयोगशाळेत सर्वेक्षणासाठी पाठविण्यात आले. त्यानुसार अधिकतम पाळीव प्राण्यांच्या रक्त नमुन्यामध्ये लेप्टो जंतूच्या प्रजाती आढळून आल्या.

(३) हे खरे आहे. जुलै ते ऑक्टोबर दरम्यान लेप्टोचे रुग्ण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभागात आढळुन आले. परंतु अधिकतम मृत्यु मालाड ते दहिसर या परिसरात आढळून आले.

(४) तबेले व गोठे यांच्या मालकांना त्यांच्याकडे असणाऱ्या पाळीव प्राण्यांचे मलमुत्र निर्जंतुक करुन त्याची विल्हेवाट योग्य प्रकारे करण्यात यावी तसेच या मलमुत्राचा इतर पाण्याच्या साठ्याशी संपर्क येऊ नये याबाबतीत सुचना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आल्या आहेत. विभागवार आतापर्यंत २६६ गोठे/तबेले मालकांना पाहणी अहवाल (Inspection Report) देण्यात आले असून ४४ प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत. तसेच बृहन्मुंबई महानगपालिका हद्दीतील घोड्याचे तबेले दि.०७.०६.२०१६ पुर्वी बंद करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने संबंधीतांना सुचना दिल्या आहेत.

मुंबई महानगरपालिकेतर्फे लेप्टोस्पॅरोसिस या आजारावर प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या.

* पावसाळ्याच्या आधी महानगरपालिकेच्या सर्व वैद्यकीय निम्नवैद्यकीय कर्मचाऱ्यांचे साथीच्या अजारांबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले, यामध्ये ३६५ वैद्यकीय अधिकारी व १५९६ निम्नवैद्यकीय कर्मचारी तसेच ३३७३ आरोग्य स्वयंसेविका तसेच ३०६५ खाजगी वैद्यकीय व्यवसायीकांना प्रशिक्षण देण्यात आले.

* प्रशिक्षणादरम्यान यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालये, दवाखाने, आरोग्य केंद्र व खाजगी वैद्यकीय व्यवसायिक व खाजगी रुग्णालये यांना वितरीत करण्यात आल्या आहेत.

* लेप्टोस्पायरोसीसचे बाधित रुग्ण आढळलेल्या परिसरात आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांमार्फत वस्तीपातळीवर घरोघरी जाऊन तापाच्या रुग्णाचे सर्वेक्षण करण्यात आले. या अनुषंगाने जुलै ते सप्टेंबर २०१५ दरम्यान लेप्टोस्पायरोसीसचे रुग्ण आढळलेल्या विभागात २४,१४,९०१ घरांमधील ७२,४४७ लाकसंख्येचे सर्वेक्षण केले व आढळलेल्या तापाच्या रुग्णावर प्रतिबंधात्मक उपचार करण्यात आले.

* किटक नियंत्रण विभागातर्फे लेप्टोस्पायरोसीसचे रुग्ण आढळलेल्या परीसरात मुषकविरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये पिंजरे लावून उंदीर पकडणे, विष घालून उंदीर मारणे, बिळांमध्ये फवारणी करणे, रात्रपाळी मुषक संहारकाद्वारे उंदीर मारणे या प्रकारे १,७७,०७३ उंदीर नष्ट करण्यात आले.

* बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग पातळीवर वैद्यकीय आरोग्य अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन विभाग व किटक नियंत्रण विभाग यांच्यामार्फत विविध ठिकाणी स्वच्छता मोहिमा राबविण्यात येत आहेत.

* आरोग्य केंद्र कर्मचाऱ्यांमार्फत वस्तीपातळीवर जनजागृती करण्यात येत असून रहिवाश्यांना लेप्टोस्पायरोसीस आजाराच्या नियंत्रण व प्रतिबंधासाठी “हे करा व हे करु नका” बाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात येत आहे.

(५) जुन, जुलै २०१५ मध्ये झालेल्या मुसळधार पावसानंतर मुंबईच्या काही भागांत पुर सदृश स्थिती निर्माण झाल्यामुळे लेप्टोस्पॅरोसिस या आजाराचे रुग्ण जुलै ते सप्टेबर दरम्यान वाढलेले आढळून आले. परंतु सद्या लेप्टोस्पॅरोसिस या आजाराच्या रुग्णांची संख्या नियंत्रणात आहे.

---

**नांदेड जिल्ह्यातील कुंडलवाडी शहरात दारिद्र्य रेषेखालील**
**नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(१०) ३४९५७ (१६-०१-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील कुंडलवाडी शहरात दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना एकात्मिक गृहनिर्माण विकास योजनेअंतर्गत घरकुलांच्या सर्वेसाठी प्रति व्यक्ती ३०० रु. प्रमाणे तब्बल १८०३ व्यक्तीकडून सन २००७ साली नगर पालिकेने साडेपाच लाख रुपयाची वसूली केली होती. परंतू अद्यापही येथील दारिद्र्यरेषेखालील नागरिक घरकूल योजनेपासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निर्णय घेवून येथील दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०७-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमातंर्गत घरकुलांचे सर्व्हेक्षण करुन प्रस्ताव सादर करण्यासाठी कुंडलवाडी नगरपरिषदेने मे.नवनिर्माण महिला बहुउद्देशिय संस्था, अकोला या संस्थेची नियुक्ती केली होती. प्रस्तुत संस्थेने योजनेतील झोपडपट्टीतील नागरिकांकडून प्रतिव्यक्ती रु.३००/- इतकी रक्कम वसूल केली असल्याचे निदर्शनास आल्याचे मुख्य अधिकारी नगरपरिषद कुंडलवाडी यांनी कळविले आहे. सदरहू रक्कम नगरपरिषदेने वसुल केलेली नाही. याबाबत उपाध्यक्ष, म्हाडा यांचेकडून शासनाच्या दि.११ एप्रिल, २०१६ च्या पत्राने मागविण्यात खुलासा प्राप्त झाला असून त्यानुसार मे.नवनिर्माण महिला बहुउद्देशिय संस्था, अकोला या संस्थेस रक्कम वसूल करण्याचे अधिकार देण्यात आलेले नव्हते. संस्थेने केलेल्या बेकायदेशीर वसुलीबाबत या संस्थेवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे मुख्याधिकारी, कुंडलवाडी नगरपारिषद यांनी कळविले आहे.

(२) कुंडलवाडी नगरपरिषदेने सादर केलेला प्रस्ताव सुकाणू अभिकरणाने (म्हाडा) दि.२३.१.२००९ रोजी तपासणीकरिता व केंद्र शासनाच्या मंजूरीकरिता हुडको कार्यालयामार्फत सादर केला होता. तथापि केंद्र शासनाकडून राज्य शासनास मिळणारे अनुदान (Fund Allocation) कमी असल्याने प्रकल्पास केंद्र शासनाची मंजूरी मिळू शकली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेने वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रातील वाल्मिकी आंबडेकर आवास योजनेंतर्गत बांधलेल्या दोन इमारती अवघ्या १२ वर्षामध्ये अतिधोकादायक झाल्याबाबत**

**(११) ३४९७१ (२१-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रात (सत्यम व सुंदरम) वाल्मिकी आंबडेकर आवास योजनेंतर्गत बांधलेल्या दोन इमारती अवघ्या १२ वर्षामध्ये अतिधोकादायक झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या कमी कालावधीत सदर इमारती धोकादायक होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर इमारतीमधील १०७ कुटुंबियांपैकी किती कुटुंबियांना पर्यायी घरे देण्यात आली आहेत,

(४) तसेच, उर्वरितांना पर्यायी घरे केव्हा देण्यात येणार आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०७-२०१६)** :(१) ठाणे महानगरपालिकेने वर्तकनगर वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत सत्यम व सुंदरम या दोन इमारती सन २००३ मध्ये बांधण्यात आल्या आहेत. या योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या दोन्ही इमारतींचे तांत्रिक परिक्षण मे, सेंटरटेक या सल्लागारामार्फत करण्यात आले असून सदर इमारती ह्या अतिधाकादायक असून राहण्यायोग्य नसल्याबाबत तांत्रिक परिक्षण अहवालात निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे. सदर इमारतीस

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ (१) (२) (३) (४) अन्वये धोकादायक असल्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

(२) मे. सेंटस्टेक यांच्या दिनांक १६.३.२०१५ च्या संरचनात्मक परिक्षण अहवालात कमी कालावधीत इमारती धोकादायक झाल्याची कारणमिमांसा करताना निकृष्ट दर्जाचे बांधकाम असे दर्शविले आहे.

(३) व (४) ठाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत एकूण १६० लाभार्थ्यांच्या घरकुलांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. म्हाडाचा सहभाग हा "नोडल एजन्सी" एवढाच मर्यादित आहे. सत्यम व सुंदरम या सहकारी संस्थांमधील इमारतीतील रहिवाशांना पर्यायी घरे देण्याची जबाबदारी संबंधित सहकारी संस्थेची व जमिन मालक म्हणून ठाणे महानगरपालिकेची आहे.

---

### सिन्नर शहरात नव्याने झालेल्या उपनगरांमध्ये सांडपाणी व्यवस्थापनेची व्यवस्था नसल्याबाबत

**(१२) ३५७५८ (२१-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर शहरात नव्याने झालेल्या उपनगरांमध्ये सांडपाणी व्यवस्थापनेची व्यवस्थाच उपलब्ध नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असून येथील सांडपाणी व्यवस्थापन तसेच रस्त्यांच्या कामांसाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. १८/०३/२०१५ व दि. २६/०३/२०१५ व दि. ३०/०७/२०१५ रोजी वा त्या सुमारास मा. नगरविकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनासह निधीची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१) होय.

(२) शासनास प्राप्त विविध निवेदनाच्या अनुषंगाने सन २०१४-१५ मध्ये रु. १.०५ कोटी व सन २०१५-१६ रु. ३५ लक्ष निधी सिन्नर नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भिवंडी तालुक्यातील वऱ्हाळदेवी व भादवड येथील तलावांची झालेली दुरवस्था

**(१३) ३६९८४ (२१-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील वऱ्हाळदेवी व भादवड येथील तलावांची दुरावस्था झाली असून त्यामुळे तेथे दुर्गंधी पसरुन साथीचे रोग पसरत असल्याने तेथील तलावाचे सुशोभिकरण करण्यासाठी निधी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे जुलै २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर परिसरातील तलावांचे सुशोभिकरण करण्यासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१) होय.

(२) शासनास प्राप्त विविध निवेदनाच्या अनुषंगाने सन २०१५-२०१६ मध्ये भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेस पायाभूत सोई-सुविधांकरीता रु. १० कोटी  वितरीत करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी-निजामपूर शहर (जि.ठाणे) येथील गलिच्छ वस्ती**
**सुधार कामांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१४) ३७०१४ (२१-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर शहर जि.ठाणे येथील बहुसंख्य नागरिक झोपडपट्टीत राहत असून त्या वस्त्यातील रस्ते व गटारे नादुरुस्त असल्यामुळे तेथील स्थानिक नागरिकांना साथीच्या रोगाचा प्रादूर्भाव होत असल्यामुळे सदर भागात गलिच्छ वस्ती सुधार कामांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार सदर परिसरात गलिच्छ वस्ती सुधार कामांकरिता निधी उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेस पायाभूत सोई-सुविधांकरीता रु. १० कोटी  व रस्ता अनुदानांतर्गत रु. ७५ लक्ष वितरीत करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद नगरपरिषदेच्या हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सुविधा पुरविण्याबाबत**

**(१५) ३७९३६ (२१-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद नगरपरिषदेच्या हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सुविधा पुराविण्यासाठी नगरपरिषदेने मा. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या मार्फत दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी अंदाजे रुपये १९ कोटीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८ मध्ये हद्दवाढीस मान्यता मिळूनही अद्याप या वाढीव क्षेत्रात नागरी सुविधा पुराविण्यासाठी निधी मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१), (२) व (३) होय. “नगरपालिका/नगरपारिषद यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रामध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य” या योजनेअंतर्गत उस्मानाबाद नगरपरिषद अर्थसहाय्याकरीता विहीत केलेल्या अटीनुसार पात्र न ठरल्याने निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानखुर्द (प) येथील इमारतींची मुलभूत सोयी-सुविधांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत**

**(१६) ३९८१७ (१३-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजीवनी को.ऑप.हौ.सो. पी.एम.जी.पी. कॉलोनी, मानखुर्द, (प), मुंबई-४३. येथील इमारत अनुक्रमे क्र. ५३,५५,५६,५७ आणि ६० च्या डागडुजी, रंगरंगोटी व तदनुषंगिक मुलभूत सोयी-सुविधांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित रहिवाशी संघ, सेवाभावी संस्था यांनी मा. मुख्यमंत्री, मंत्री (गृहनिर्माण), राज्यमंत्री (गृहनिर्माण), प्रधान सचिव (गृहनिर्माण), अध्यक्ष (म्हाडा), मुख्य कार्यकारी अधिकारी (म्हाडा अंकित एस.आर.ए.संस्था) यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-०७-२०१६) :**(१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मा.श्री.अबु आजमी, वि.स.स. यांचे पत्र दि.१६.११.२०१५ रोजी तर स्वीय सहायक मा.राज्यमंत्री गृहनिर्माण यांचे पत्र दि. २६.११.२०१५ रोजी म्हाडा कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) विषयांकित इमारती भारतीय नौसेना विभागास सन २००० च्या दरम्यान म्हाडातर्फे हस्तांतरीत करण्यात आले असून सदर इमारतींचे पंजीकरण झाले आहे. त्यामुळे सदर इमारतींची डागडुजी, रंगरंगोटी व तद्नुषंगिक मूलभूत सोयी-सुविधांची कामे करण्याची जबाबदारी संजीवनी को.ऑप.हौ. सोसा. पी.एम.जी.पी. कॉलनी, मानखुर्द (प.), मुंबई -४३ यांची असल्याचे मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी त्यांच्या अहवालात नमुद केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नशिराबाद (जि.जळगांव) या गावाला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळण्याबाबत**

**(१७) ४०११८ (२०-०५-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नशिराबाद (जि.जळगांव) या गावाला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळावा यासाठी जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी वारवांर शासनाकडे पाठपुरावा केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी विकास कामांना अद्यापही सुरुवात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणची विकास कामे तातडीने सुरु करुन या योजना कार्यान्वित करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१६) :**(१)नाही.

नशिराबाद (जि.जळगांव) या गावाला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळावा याबाबत कोणताही प्रस्ताव प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेण(जि. रायगड) येथील म्हाडा वसाहतीतील समस्या आणि म्हाडाच्या अधिका-यांचा अनागोंदी कारभाराबाबत**

**(१८) ४०३५२ (१६-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि. रायगड) येथील म्हाडा वसाहतीतील समस्या आणि म्हाडाच्या अधिका-यांचा अनागोंदी कारभाराबाबत लेखी निवेदन सर्वोदयनगर वेलफेअर असोसिएशन (रजि.) म्हाडा वसाहत, पेण यांनी मा. मुख्याधिकारी, कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई यांना दिनांक ३०.१२.२०१५ रोजीच्या सुमारास देऊनही अद्याप या संदर्भात कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) सर्वोदय नगर वेलफेअर असोसिएशन (रजि.) म्हाडा वसाहत, पेण यांच्या निवेदनांच्या अनुषंगाने पेण जि.रायगड येथील म्हाडा वसाहतीतील भूखंडापैकी काही भूखंडावर झालेले अतिक्रमण काढण्याविषयी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३ नुसार नियोजन प्राधिकरण म्हणून अतिक्रमण काढण्याविषयी कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने दि.१२.०७.२०१२, दि.२३.१२.२०१३, दि.०८.०१.२०१४, दि.०२.०३.२०१५ व दि.०८.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये निष्कासनाची कार्यवाही करण्याकरीता मुख्य अधिकारी, पेण नगरपरिषद यांना कळविले आहे.

---

### कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(१९) ४०५०४ (१३-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये एमआयडीसी कडून ३० टक्के पाणी कपात तसेच आठवड्यातून दोन दिवस पाणी पुरवठा बंद केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठ्याकरिता कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) पाणी टंचाई कृती आराखडा-२०१६ अंतर्गत महानगरपालिकेकडून पालिका क्षेत्रातील विहिरींची साफसफाई, कुपनलिकांची दुरुस्ती, नवीन कुपनलिका खोदणे व पाणी टंचाईग्रस्त भागात तात्पुरती पाणी पुरवठा योजना इत्यादी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. तसेच ज्या भागात पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. तेथे महानगरपालिकेकडून टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

उपरोल्लेखित उपाययोजनांच्या माध्यमातून पाणी टंचाईवर काही प्रमाणात मात करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुकत, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात मोबाईल कंपनीकडून बेकायदेशीर खोदकाम होत असल्याबाबत**

**(२०) ४१०६० (१७-०५-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील मोबाईल कंपन्यांच्या खोदाईसाठी कनेक्टिव्हीटी न देताच मुदत वाढ देण्यात आल्याचे माहे डिसेंबर २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कनेक्टिव्हीटी न देताच खोदाईसाठी परवानगी देणाऱ्यांवर तसेच संबंधित मोबाईल कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :**(१) खोदाईस मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तथापि, सदर मोबाईल कंपन्यांनी नव्याने शहरात टाकलेल्या केबल्स अद्याप कार्यान्वीत झालेल्या नसून सदर केबल्स कार्यान्वीत झाल्यानंतर सदरील मोबाईल कंपन्या २ mbps बॅन्डविडथ कनेक्टीव्हीटी देण्याची कार्यवाही करणार आहेत.याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत सदर कंपन्याना कळविण्यात आले असून, रिलायंन् जिओ इन्फोकॉम कंपनी व एअरटेल कंपनीने कार्यवाही सुरु केली आहे. व्होडाफोन, आयडीया, टाटा टेलिकम्यनुकेशन, टाटा टेलिसर्व्हिसेस, टाटा इंडिकॉम या कंपन्यांनी सुध्दा अद्याप २ mbps बॅन्डविडथ कनेक्टीव्हीटी दिलेली नाही. सदर बाब माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या निदर्शनास आणण्यात आलेली आहे.

(२) व (३) नाही. परंतु या संदर्भात मा.राज्यमंत्री नगर विकास यांनी त्यांचे दालनात दि. ३१/५/२०१६ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीस अनुसरून पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

सदर कंपन्यांना नव्याने केबल खोदाई साठी परवानगी न देण्याचा निर्णय पुणे मनपाने घेतलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आधार कार्ड केंद्रावरुन नागरिकांची लुट होत असल्याबाबत.**

**(२१) ४१३७६ (२०-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने प्रत्येक नागरिकासाठी आधार कार्ड काढणे सक्तीचे केले असून शासनाने काही ठराविक रक्कम भरून आधार कार्ड काढून देण्याची परवानगी काही महा-ई सेवा केंद्रांना दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महा-ई सेवा केंद्र लोकांकडून २० ते २०० रुपयापर्यंत रक्कम वसूल करुन त्याची कोणतीही पावती देत नसल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणत लुट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांची लुट करणाऱ्या आधार कार्ड केंद्रावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६) :**(१) आधार कार्ड काढणे सक्तीचे करण्यात आलेले नाही. आधार नोंदणी निशुल्क आहे, आधार कार्ड नोंदणीसाठी महा-ई-सेवा केंद्राना परवानगी देण्यात आली आहे.
(२), (३) व (४) काही जिल्ह्यांशी संबंधित तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असून त्यासंदर्भात चौकशी करुन संबंधितांवर आवश्यक कारवाई करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दिनांक १/४/२०१५ ते आज पावेतो ३२३ ऑपरेटरांना काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात आली आहे.

---

**पीएमपीच्या बस वारंवार रस्त्यातच बंद पडत असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(२२) ४१६८४ (२८-०४-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा - पिंपरी शहरातील पीएमपीएलएम या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची दुरवस्था झाली आहे. तिकीट दर वाढवूनही पीएमपी बस सेवेचा दर्जा व गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत चालली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी चिंचवड शहरात तीन बस डेपो आहेत, यामध्ये निगडी भक्ती शक्ती डेपो व भोसरी डेपोमध्ये दररोज ३ ते ४ बंद पडलेल्या बस येतात तसेच नेहरूनगर डेपोमध्ये १० ते १२ बस येतात म्हणजे शहरात दररोज १५ ते २० बसेस बंद पडतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दररोज बंद होत असलेला बसचा त्रास नोकरदार, शालेय विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, महिला यांना होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बसचा होणारा त्रास थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी, भोसरी, निगडी या डेपोकडील पुर्व पीसीएमटी असताना बसेसची संख्या २५२ होती. महामंडळ अस्तित्वात आल्यानंतर पिंपरी चिंचवड शहरासाठी महामंडळ, पीपीपी, भाडेतत्वावरील अशा सर्व मिळून ४७० बसेसपैकी सरासरी ४०० बसेस

मार्गावर संचालनास उपलब्ध असतात.

पुर्व पीसीएमटी च्या तुलनेत बसेसची संख्या वाढलेली असून महामंडळाकडून विविध मार्गावर बसेस संचालनात असतात. त्यामध्ये काही मार्ग तोट्यात असून देखील प्रवाश्यांच्या सेवेसाठी सदर मार्ग सुरु ठेवले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

परिवहन महामंडळाकडे १२ वर्षापुढील आयुर्मान असलेल्या ९१ बसेस १० ते १२ वर्षे आयुर्मान असलेल्या २३३ बसेस अशा एकुण ३२४ बसेस आहेत. परिवहन महामंडळाकडील अपुऱ्या बसेसमुळे नाईलाजस्तव सदर बसेस संचलनात आणाव्या लागतात. हि वस्तुस्थिती आहे. परिवहन महामंडळाकडे सद्यस्थितीत एकुण २०५५ इतका बस ताफा आहे.

परिवहन महामंडळाकरीता ७०० बसेसची खरेदी व ५०० बसेस भाडेतत्वावर अशा एकुण १२०० बसेसची वाढ करण्यासाठी संचालक मंडळाने ठराव पारीत केला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

परिवहन महामंडळाकडे असलेल्या ४७० बसेसपैकी सरासरी ४०० बसेस संचालनाकरीता उपलब्ध असतात. बसेसच्या सक्षम देखभाल दुरुस्तीसाइी ६% राखीव रक्कम ठेवण्यात आली आहे. परिणामी ब्रेकडाऊनचे प्रमाण कमी होत आहे.

मार्गावर बसेस बंद पडल्यास प्रवाशांना त्वरीत मार्गावरील इतर बसेसद्वारे सेवा देण्याची व्यवस्था करण्यात येते. त्यामुळे बंद पडलेल्या बसेसचा त्रास नोकरदार, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक महिला यांना होणार नाही याची दक्षता घेण्यात येते. तसेच सदर ब्रेकडाऊन बस दुरुस्तीसाठी ब्रेकडाऊन व्हॅन पाठविण्यात येते.

(४) परिवहन महामंडळामार्फत खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत

१) परिवहन मंडळाने ठराव क्र.९१ दिनांक ११/०४/२०१६ अन्वये महामंडळाकरीता ७०० बसेसची खरेदी व ५०० बसेस भाडेतत्वावर अशा एकूण १२०० बसेसची वाढ करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे.

२) महिलांसाठी तेजस्विनी योजने अंतर्गत काही बसेस खरेदीसाठी प्रयत्न सुरु आहेत.

३) पीएमपीएमएल च्या ताफ्यातील बसेसपैकी मुख्यत: भाडेतत्वावरील बसेस बंद पडण्याचे प्रमाण जादा असल्याने बंद पडलेल्या बसेसचे प्रमाण कमी करण्यासाठी संबंधित ठेकेदारास नोटीसा देण्यात आलेल्या असून तसेच वेळोवेळी घेण्यात आलेल्या बैठकीत ब्रेकडाऊन कमी करणेविषयी स्पष्ट सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच बंद पडलेल्या बसेसवर नियमितपणे दंड आकारणी करण्यात आलेली आहे.

४) पुणे व पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या विचारात घेता एकूण ३००० बसेसची आवश्यकता आहे. सध्या २०५५ बसेस पैकी १६०० बसेसचे मार्गावर संचलन चालू आहे.

५) महामंडळाकडील मालकीच्या बसेस देखभाल दुरस्तीसाठी ६% स्वतंत्र राखीव निधी ठेवण्यात येत असून, मागील वर्षीच्या विविध उपाययोजनांमुळे सरासरी मासिक ब्रेकडाऊन १५०० वरुन १००० पर्यंत म्हणजेच ३३.३३% ब्रेकडाऊनचे प्रमाण कमी झाले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयात समांतर योजनेतून २४ तास पाणीपुरवठा त्वरित सुरु करण्याबाबत**

**(२३) ४२११० (२८-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात समांतर योजनेतून २४ तास पाणीपुरवठा केला जाणार असल्याने सदर योजनेतून नागरीकांवर कोणताही बोजा नसावा तसेच या योजनेची अंमलबजावणी झाली पाहिजे अशी भूमिका औरंगाबाद आयुक्तांनी मांडली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेच्या तांत्रिक व आर्थिक मॉडेलची आयुक्तांनी तपासणी सुरु केली असून सदर योजना त्वरित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) तत्कालीन आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी योजनेचा तांत्रिक व वित्तीय दृष्ट्या अभ्यास करुन त्यांचे वैयक्तिक मत अहवाल स्वरुपात दि. ०६.०१.२०१६ रोजी शासनास सादर केले आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने मंजुर केलेल्या तिमाही प्रकल्प माईलस्टोन नुसार कामाची प्रगती नसल्याने महानगरपालिकेने सवलतधारकास नोटीस दिली आहे. सदर नोटीसच्या संदर्भात सवलतधारक यांनी नोटीसचा मुद्देनिहाय सविस्तर खुलासा औरंगाबाद महानगरपालिकेकडे सादर केला असून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

---

**नगर परिषद, चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती व नुतनीकरण**

**(२४) ४२७१८ (०५-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर परिषद, चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील हुतात्मा स्मारकाची दुरुस्ती व क्रांतीविरांच्या स्मृतीचे जतन अंतर्गत हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती व नुतनीकरण करण्याच्या प्रस्तावास निधीसह मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.वित्त व नियोजन मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हुतात्मा स्मारक दुरुस्तीचा अंदाजपत्रकासह रु.१०१.०२ कोटी चा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१) होय.
(२) हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती व नुतनीकरण करण्याबाबत विचार सुरु आहे.

---

**कोकण गृहनिर्माण मंडळाने ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यात विविध ठिकाणच्या भागातील १६५ हेक्टर जागा खरेदी करण्यास मागितलेली शासनाची मंजूरी**

**(२५) ४२९६० (१७-०५-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेशात लँडबँक तयार करून महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) कोकण गृहनिर्माण मंडळाने ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यात विविध ठिकाणच्या २३ भागातील १६५ हेक्टर जागा खरेदी करण्यास शासनाची मंजूरी मिळावी यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १६५ हेक्टर जमिनीवर किती घरे बांधण्याचा आराखडा कोकण गृहनिर्माण मंडळाने तयार केला आहे व त्यामध्ये अत्यल्प उत्पन गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट अशा विविध गटातील एकूण किती घरे बांधण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, शासनाने कोकण गृहनिर्माण मंडळाच्या १६५ हेक्टर जागा खरेदीच्या प्रस्तावास मंजूरी दिली आहे काय व कोकण गृहनिर्माण मंडळाने मागितलेली जागाही जिल्ह्यातील कोणत्या ठिकाणी आहे,
(४) अद्याप शासनाने प्रस्तावास मंजूरी दिली नसल्यास विलंबाची कारणे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०७-२०१६) :**(१), (२), (३) व (४) ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील २३ शासकीय जमिनी नाममात्र दराने म्हाडास मिळाव्यात असा प्रस्ताव कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने म्हाडामार्फत शासनास सादर केला.

शासकीय जमिनी म्हाडा तसेच शासकीय /निमशासकीय संस्थांना रु.१/- प्रति चौ.मी. दराने उपलबध करुन देण्याबाबत मंत्री परिषदेने निर्णय घेतला असून त्याबाबतचे औपचारिक आदेश महसलू व वन विभागाकडून काढण्यात येणार आहेत.

महसूल विभागाकडून आदेश निर्गमित होणे तसेच या जमिनीवर काही आरक्षण असल्यास ती बदलणे आवश्यक आहे. आरक्षणे बदलून सदर जमीन गृहनिर्माणासाठी उपलब्ध होण्यासंदर्भात नगर विकास विभागासोबत म्हाडाच्या वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करण्यात येत आहे. या जमिनी म्हाडास उपलब्ध झाल्यावर गृहनिर्माणाच्या प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.

---

### मंत्रालयातील एका कचरापेटील २६ जिवंत काडतुसे मिळाल्याबाबत

**(२६) ४३००५ (१७-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयातील एका कचरापेटीत तब्बल २६ जिवंत काडतुसे मिळाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे आयुक्तालयातील पोलीस कर्मचारी नागनाथ नाईक एका लोकप्रतिनिधीच्या सुरक्षेसाठी कार्यरत असुन त्यांच्या नजरचुकीने २६ जिवंत काडतुसे गहाळ झाली हे पाहता या निष्काळजी पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) पोशि/३१८० नागनाथ दत्तात्रय नाईक यांना सदरच्या निष्काळजीपणाबाबत त्यांना पोलीस उपायुक्त, ठाणे यांनी त्यांचे आदेश क्र. ठाआ/५०/विचौ ३/अंआ/७८/१६, दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी अन्वये रुपये १०००/- दंडाची शिक्षा देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगांव (जि.नाशिक) आय.एच.एस.डी.पी.योजनेअंतर्गत वस्त्रोद्योग क्षेत्रातील कामगारांचा समावेश करणेबाबत

**(२७) ४३०७९ (१७-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) आय.एच.एस.डी.पी. योजनेअंतर्गत अजून ४००० ते ६००० घरकुले शिल्लक असल्याने या रिक्त जागांवर वस्त्रोद्योग क्षेत्रातील कामगार, मुकादम, जाबर यांना घरकुल योजनेत समाविष्ट करणेबाबत मा.मंत्री गृहनिर्माण यांना दिनांक १७.११.२०१५ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे प्रामुख्याने यंत्रमाग हा व्यवसाय असून या व्यवसायामध्ये काम करणाऱ्या मुकादम व इतर कामगारांची राहण्याची व्यवस्था योग्य नसल्याने त्यांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी,२०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२१-०७-२०१६) :**(१) श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) वि.स.स. यांनी मा.मंत्री (गृहनिर्माण) यांना लिहिलेल्या दि.१५.११.२०१५ च्या पत्राची प्रत उपमुख्य अभियंता, सुकाणू अभिकरण, म्हाडा यांनी आयुक्त, मालेगांव महानगरपालिका यांना पाठविण्यात आली आहे. केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रमतंर्गत मालेगांव महानगरपालिके अंतर्गत १५८४० घरकुल प्रकल्पास केंद्रीय मान्यता व संनियत्रण समितीने (CSMC) दि.२१.१.२००९ व दि.२८.३.२०१२ रोजी मंजूरी दिली आहे. मालेगांव महानगरपालिकेने सादर केलेल्या माहे मे, २०१६ च्या मासिक प्रगती अहवालानुसार एकुण ७१२८ घरकुलांचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरीत एकुण ८७१२ इतक्या घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. मात्र सदर बाब मालेगांव महानगरपालिकेशी संबंधीत नसल्याचे आयुक्त, मालेगांव महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) आयुक्त, मालेगाव महानगरपालिकेने कळविल्यानुसार मालेगाव शहरात माहे जानेवारी, २०१६ मध्ये एकूण ७२ क्षयरुग्ण आढळून आले असून त्यापैकी ०७ रुग्ण हे वस्त्रोद्योग नसलेल्या परिसरातील होती तसेच ६५ रुग्ण हे यंत्रमाग परिसरातील रहिवाशी असल्याचे आढळून आलेले आहे. बहुतांश रुग्ण हे यंत्रमाग कारखान्यातील कामगार असून त्यांच्यावर मालेगांव महानगरपालिकेच्या दवाखान्यात नियमित उपचार सुरु आहेत.

---

### ठाणे परिवहन सेवेत चालक आणि वाहकांची जागा भरण्याबाबत

**(२८) ४३२४७ (२८-०४-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे परिवहन तिकिटामध्ये अपहार होत असल्याचे लक्षात आल्यानंतर मागील सात दिवसांमध्ये सहा वाहकांवर निलंबानाची कारवाई करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे परिवहन सेवेत २३० कर्मचारी असून आजही १८२ चालक आणि १५५ वाहकांची आवश्यकता आहे तसेच परिवहन सेवेत बस कमी असल्याने काही मार्गावर अर्ध्या-अर्ध्या तासावर बस धावत असून त्या मार्गावरील प्रवाशांची बसमध्ये गर्दी होत असल्याने कॅश अधिक अथवा कमी होत असून संबंधित वाहकांवर निलंबनाची कारवाई करणे योग्य नाही असे वाहकाचे मत आहे तरी याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती ठाणे परिवहन सेवेत चालक आणि वाहकांची जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.

माहे डिसेंबर २०१५ ते जानेवारी २०१६ या कालावधीमध्ये तिकिट विक्रीचा अपहार केलेल्या ६

वाहकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
ठाणे परिवहन सेवेच्या आस्थापनेवर आजमितीस २१६४ कर्मचारी असून २०० चालक व १६० वाहकाची पदे रिक्त आहेत.
(३) चालक व वाहक यांची रिक्त पदे भरण्याकरीता वृत्तपत्रामध्ये माहे ऑक्टोबर २०१० मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. त्या अनुषंगाने अनुसूचित जाती संवर्गातील २९ चालकांची पदे भरण्यात आली आहेत.
जररम अंतर्गत प्राप्त होणाऱ्या १९० बसेस या ठेकेदारामार्फत चालविण्यात येणार असुन बसवरील चालक हे ठेकेदाराचे असणार आहेत.
वाहकांची कमतरता लक्षात घेता मार्च २०१६ मध्ये वृत्त पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ठेकेदारामार्फत ४०० वाहक कर्मचारी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंभी (जि.अमरावती) या गावात एका महिलेने आपल्या एका महिन्याच्या मुलीला पेटत्या चुलीत टाकून जाळल्याबाबत

**(२९) ४३५११ (१६-०५-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंभी (जि.अमरावती) या गावात एका महिलेने आपल्या एका महिन्याच्या मुलीला पेटत्या चुलीत टाकून जाळल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर महिलेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच अशा घटना रोखण्यासाठी व समाजप्रबोधनासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी महिला आरोपीविरुध्द पो.स्टे. परतवाडा येथे अप.क्र. ११/१६, कलम ३०२, २०१ भादंवि, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर महिलेविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र वि.न्यायालयात दाखल केले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) लिंग निवडीस प्रतिबंध करणे, बालिकेचा जन्मदर वाढविणे, मुलींच्या जीवनमानाच्या सुरक्षेबद्दल खात्री देणे, बालिकेचा समान दर्जा व शैक्षणिक प्रोत्साहनाकरिता समाजात कायमस्वरुपी सामुदायिक चळवळ निर्माण करणे या उद्दीष्ट पुर्तीसाठी माझी कन्या भाग्यश्री ही नवीन योजना दि. १ एप्रिल, २०१६ पासुन राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

---

**पुणे शहरातील हाऊस किपींग कंपनीचा व्यवसाय कर कमी करण्यासाठी सहाय्यक विक्री आयुक्तांनी लाच मागितल्याबाबत**

**(३०) ४३५८६ (१६-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील हाऊस किपींग कंपनीचा व्यवसाय कर कमी करण्यासाठी सहाय्यक विक्री आयुक्तांनी १३ लाख रुपयांची मागणी केली असता लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून त्यांना पकडल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) तक्रारदार श्री.गौरव राजाराम पाठक यांच्या पुणे शहरातील हाऊस किपींग कंपनीकडून विक्रीकर विभागास भरावयास लागणारा व्यवसाय कर कमी करण्यासाठी श्री.सोमनाथ मधुकर नलावडे, सहायक विक्रीकर आयुक्त यांनी रु.२३,००,०००/- इतकी लाचेची मागणी करुन खाजगी इसम शिवाजी कृष्णा गुजर यांच्यामार्फत रु.१३,००,०००/- इतकी रक्कम स्वीकारताना दि.२७.१०.२०१५ रोजी पकडण्यात आले आहे.

या संदर्भात त्यांचेविरुध्द चर्तु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.क्र. ३१२०/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये दाखल करण्या आला असून त्यांना दि.२८.१०.२०१५ रोजी अटक करण्यात आली. सद्य:स्थितीत मा.न्यायालयाने त्यांची जामीनावर मुक्तता केली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयातील शाखा अभियंत्यास लाच घेताना पकडल्याबाबत**

**(३१) ४३६७६ (२४-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयातील शाखा अभियंत्यास २५ हजार रुपयांची लाच घेताना लाच लुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी दि. २ डिसेंबर, २०१५ रोजी पकडले असून याबाबत लोणी काळभोर पोलीस स्टेशन, ता. हवेली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाखा अभियंत्याने शिंदवणे, ता. हवेली येथील शेतजमीन अकृषक वापर करण्यासाठी खडकवासाला धरण लाभक्षेत्रात येत नसल्याचा दाखला देण्यासाठी लाच मागीतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावरुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) व (४) तक्रारदार श्री.अनिल लक्ष्मण कांचन व त्यांचा मावस भाऊ यांच्या शेत जमिनी खडकवासला पाटबंधारे विभागाच्या लाभ क्षेत्रात येत नसल्याबाबतचा दाखला देण्यासाठी श्री. अनिल रावसाहेब चव्हाण, शाखा अभियंता यांनी रु.५०,०००/- इतकी लाचेची मागणी करुन रु.२५,०००/- लाचेची रक्कम स्वीकारताना दि.०२.१२.२०१५ रोजी पकडण्यात आले आहे.

या संदर्भात त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन लोणी काळभोर, पुणे ग्रामीण येथे गु.र.क्र.३१४/२०१५, लाचलुचपत प्रतिबधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये दाखल करण्यात आला असून दि.०२.१२.२०१५ रोजी अटक करण्यात आली. सद्य:स्थितीत मा.न्यायालयाने त्यांची जामीनावर मुक्तता केली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे. त्याचप्रमाणे सहाय्यक मुख्य अभियंता (प्रकल्प व प्रशासन), जलसंपदा विभाग, पुणे यांचे दिनांक १०.०२.२०१६ च्या आदेशान्वये श्री.अनिल रावसाहेब चव्हाण, शाखा अभियंता यांना निलंबीत करण्यात आले आहे.

---

## नवी मुंबईत घरफोडीच्या घटना सातत्याने होत असल्याबाबत

**(३२) ४४०७७ (१६-०५-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत घरफोडीच्या घटना सातत्याने होत असून खांदेश्वर, पनवेल, कळंबोली, कामोठे पोलिस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीचे प्रमाण वाढल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेबाबत खांदेश्वर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंद करुनही घरफोडीचे प्रकार थांबत नसल्याने संतप्त नागरीक रस्त्यावर उतरुन पोलिसां विरोधात आक्रमक झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घरफोडीचे प्रकार रोखण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई क्षेत्रात सन २०१५ या वर्षात ६०९ घरफोडीचे गुन्हे दाखल झाले होते तर माहे एप्रिल, २०१६ अखेर १५७ गुन्हे दाखल झाले आहेत. सदर आकडेवारीवरुन

घरफोडीच्या गुन्ह्यात घट झाल्याचे दिसून येते.

(२) हे खरे नाही.

(३) घरफोडीचे प्रकार रोखण्याकरिता नवी मुंबई हद्दीतील सोसायटीच्या सदस्यांच्या पोलीस ठाणे स्तरावर बैठका घेऊन त्यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

अ) सोसायटीमध्ये नेमण्यात आलेले सुरक्षा रक्षक, सफाई कामगार, भाडेकरु यांची त्यांच्या मूळगावासह तसेच त्यांचे इतर नातेवाईक यांची सविस्तर माहिती घेण्यात यावी.

ब) रहिवाशी सोसायट्यामध्ये आतील व बाहेरील बाजूस सीसीटीव्ही बसविणेबाबत लोकामध्ये जनजागती केली जात आहे.

क) घरातील मौल्यवान वस्तु सुरक्षिततेसाठी लॉकरमध्ये ठेवण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

तसेच घरफोड्याचे प्रकार रोखण्यासाठी दिवसपाळी रात्रापाळी गस्त वाढविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे शहरातील झोपडपट्टी पुनवर्सन योजनेतील भोगवटा प्रमाणपत्राबाबत

**(३३) ४४५१२ (१३-०५-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत बांधलेल्या इमारतींना भोगवटा वापर परवान्यासाठीचे प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दिनांक २८ ऑक्टोबर २०१५ पर्यंत असतांना सदर मुदतीबाबत नागरिकांना महानगरपालिका शहर अभियंता यांनी ज्ञात केले नाही व वेळेत प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव झोपडपट्टी पुनवर्ससन प्राधिकरण कार्यालयात पाठविण्यास विलंब झाला यामुळे अनेकांचे प्रस्ताव प्राधिकरणाकडून स्विकारण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या प्राधिकरण व महानगरहापालिका यांचे योग्य समन्वयाअभावी नागरीकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागल्याने सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या नगर विकास अभियंता, महानगरपालिका,ठाणे यांचेवर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने नगर अभियंत्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

ठाणे महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी कळविल्यानुसार ठाणे महानगरपालका क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमधी अधिकृत परंतु वापर परवाना न

घेतलेल्या इमारतींना अभय योजनेंतर्गत दंड आकारणे सुट देऊन वापर परवाना देण्यासाठीची जाहिर सुचना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे दि.२४.०४.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर अभय योजनेची मुदत ६ महिन्यासाठी म्हणजेच दि.२३.१०.२०१५ पर्यंत होती. सदर कालावधीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.३०.०६.२०१५ पर्यंत ठाणे महानगरपालिकेकडून ४ व दि.२३.१०.२०१५ पर्यंत संबंधित संस्था व वैयक्तिक लाभ धारक यांचेकडून ४७८ असे एकूण ४८२ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. ठाणे महानगरपालिकेकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतींबाबत १८७ प्रस्ताव संबंधित संस्थांना परत दिल्यानंतर ते झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे वेळेत जमा करुन घेण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील दोन वाळू व्यवसायिकांमध्ये झालेल्या भांडणातून एका व्यावसायिकांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३४) ४४५६६ (१६-०५-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील नेरुरपार पुलानजीक दोन वाळू व्यवसायिकांमध्ये झालेल्या भांडणात डोक्यावर लोखंडी रॉडसारखी वस्तु वर्मी बसल्याने धामापूर येथील जगन्नाथ उर्फ जगदीश रामचंद्र चव्हाण या व्यावसायिकांचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमुळे वाळू व्यावसायिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले असून सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून सदरची घटना ही प्रेम संबंधातून घडल्याने वाळू व्यावसायिकामध्ये कोणत्याही प्रकारचे घबराटीचे वातावरण निर्माण झालेले नाही. सदर प्रकरणी कुडाळ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.न. ७/२०१६ भा.द.वि. क. ३०२, ३४ अन्वये दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्यात २ आरोपींना अटक केलेली असून त्यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. गुन्हा न्याय प्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी शहरातील वंजारपाटी नाक्यावर उड्डाणपुलावरुन जाण्यासाठी ठेकेदाराने चुकीचे दिशादर्शक फलक लावल्याबाबत**

**(३५) ४४६६५ (२९-०४-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील वंजारपाटी नाक्यावर कोट्यावधी रुपये खर्च करुन बांधलेल्या उड्डाणपुलावरुन जाण्यासाठी ठेकेदाराने चुकीचे दिशादर्शक फलक लावल्याने पुलावरुन जाणारी वाहने चुकीच्या मार्गावरुन जात असल्याबाबतच्या तक्रारी गत दीड महिन्यापासून करुनही संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चुकीच्या दिशादर्शक फलक व इतर असुविधेबाबत मा.मुख्यमंत्री व इतर अधिकाऱ्यांकडे तक्रारी करुनही अद्यापही ठेकेदारांकडून तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात लाचलुचपत प्रकरणात दोषी ठरविण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेतुन बडतर्फ करण्यात आलेले नसल्याबाबत**

**(३६) ४५७८८ (१७-०५-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वेगवेगळया ठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून केलेल्या कारवाईत ४२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना दोषी ठरविण्यात आले असुन विविध शासकिय कार्यालयात १५८४ शासकीय कर्मचाऱ्यांनी २ कोटी ४६ लाख २३ हजार ९७१ रुपयांची लाच मागितल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईतून स्पष्ट झाले असून अद्यापही सदर कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेतुन बडतर्फ करण्यात आलेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने त्वरीत चौकशी करुन दोषापितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१६) :**(१), (२) व (३) दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ या कालावधीत राज्यामध्ये विविध शासकीय कार्यालयातील १५९३ लाचखोर व्यक्तींना एकूण २ कोटी ४६ लाख ६२ हजार ६७१ रुपयाची लाच मागितल्या प्रकरणी पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबधक अधिनियमांतर्गत दाखल खटल्यात दोषी ठरवण्यात आलेल्या ४६ अधिकारी व कर्मचाऱ्यांना जानेवारी, २०१६ पर्यंत शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले नसल्याबाबत वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. तथापि, सदर ४६ लोकसेवकांपैकी २३ लोकसेवकांना शासन सेवेतून काढून टाकण्यात आले आहे. २ लोकसेवकांबाबतची प्रकरणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहमतीसाठी पाठविली आहेत. ५ प्रकरणी मा.न्यायालयाची स्थगिती आहे. तसेच ४ अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून १२ प्रकरणी संबंधीत विभागाकडून बडतर्फीची कार्यवाही सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

---

## घरेलू कामगारांना लाभ देण्याबाबत

**(३७) ४६५२१ (१३-०५-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरेलू कामगारांसाठी 'घरेलू कामगार योजना' या नावाने नवीन योजना शासनाने माहे डिसेंबर, २०११ वा त्या सुमारास सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर योजनेमध्ये आता पर्यंत किती कामगारांची नोंदणी झाली आहे,

(३) असल्यास सदर नोंदणी झालेल्या कामगारांना शासनाच्या वतीने एकूण कोणते व किती लाभ लाभार्थींना देण्यात आलेले आहे,

(४) तसेच नोंदणीकृत उर्वरित कामगारांना लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम २००८ च्या कलम ३ अंतर्गत राज्यस्तरीय घरेलू कामगार कल्याण मंडळ दि.१२/०८/२०११ रोजी स्थापन करण्यात आले असून सदर मंडळामार्फत कामगारांना विविध योजनांचा लाभ दिला जाते.

(२), (३) व (४) महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ स्थापनेपासून आजपर्यंत ४,५३,१५० घरेलू कामगारांची नोंदणी झालेली असून नोंदीत पात्र कामगारांना खालीलप्रमाणे लाभ देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभार्थी | देण्यात आलेले लाभ (रु) |
|---|---|---|---|
| १ | सन्मानधन | १३७६८ | १३,७६,८०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | अत्यंविधी | ८४ | १,६८,०००/- |
| ३ | प्रसूतीलाभ | १३६ | ६,८०,०००/- |
| ४ | जनश्री विमा योजना (आम आदमी विमा योजना) नैसर्गिक मृत्यु | ०७ | २,१०,०००/- |
| ५ | जनश्री विमा योजना (आम आदमी विमा योजना) शिष्यवृत्ती | २११८ | १२,७०,८००/- |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे व नवी मुंबईत सुमारे ४३ हजार घरे विक्री विना पडून असल्याबाबत**

**(३८) ४६९०२ (१७-०५-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे व नवी मुंबईत सुमारे ४३ हजार घरे विक्री विना पडून असल्याची माहिती जेएलएल इंडियाच्या सर्वेक्षणातून माहे जानेवारी, २०१६ च्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील घरांच्या किंमती जास्त असल्यामुळे विक्री विना पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०७-२०१६) :**(१) मुंबई, ठाणे व नवी मुंबईत सुमारे ४३ हजार घरे विक्री विना पडून असलेल्या खाजगी घरांसंबंधीची माहिती गृहनिर्माण विभागाकडे आढळून आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अचलपूर व परतवाडा (जि.अमरावती) पोलीस ठाण्याच्या हद्दीत**
**मद्यपीमुळे गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(३९) ४६९६८ (१६-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर व परतवाडा (जि.अमरावती) पोलीस ठाण्याच्या हद्दीत आमलेट पाव तसेच चिकन फ्रायच्या हातगाडयांवर मद्यपी सर्रास मद्यप्राशन करीत असून पोलीसांचा दुर्लक्षितपणा होत असल्याने सदर ठिकाणी गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रकार थांबविण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) आमलेट, पाव तसेच चिकन फ्रायच्या हातगाड्यावर मद्यपी मद्यप्राशन करताना आढळून आलेले नाही. तरीपण असा प्रकार आढळून आल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भडगाव (जि.जळगाव) येथील विविध शासकीय कार्यालयात**
**सुमारे १३२ पदे रिक्त असल्याबाबत**

**(४०) ४७७४७ (१७-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव (जि.जळगांव) तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयात सुमारे १३२ पदे रिक्त असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असून त्यामुळे कामकाजावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :**(१) भडगांव तालुकयातील विविध शासकीय कार्यालयामध्ये एकूण ९९५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ८०९ पदे भरली असून १८६ पदे रिक्त आहेत.

(२) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधीत विभागांकडून सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील शितल इस्टेट/ब्राम्हणवाडी मधील चाळींच्या पुनर्विकासासाठी नियम डावलून ना हरकत प्रमाणपत्र दिल्याबाबत**

**(४१) ४८८८९ (१७-०५-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रॅंटरोड मुंबई येथील शितल इस्टेट/ब्राम्हणवाडी मधील ९ चाळींच्या पुनर्विकासासाठी दिनांक १८ जून, २०१२ मध्ये वा त्या सुमारास नियम डावलून ना हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या मुंबई इमारत दुरूस्ती आणि पुर्नरचना मंडळाच्या अधिकारी व अभियंत्यांची चौकशी करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये शासनाकडे मागितलेली परवानगी माहे मार्च, २०१६ अखेरपर्यंत प्रतिक्षाधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) ग्रॅंटरोड मुंबई येथील इस्टेट येथील ११ चाळींच्या पुनर्विकासास परवानगी देताना झालेल्या गैरप्रकाराची उघड चौकशी करण्यास परवानगी देण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ०४.०९.२०१३ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने उपलब्ध करुन दिलेला गुप्त चौकशी अहवाल तसेच गृहनिर्माण विभागाने दिलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने उघड चौकशीसंदर्भात करावयाची कार्यवाही याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**बडनेरा मधील मंजूर असलेल्या गाळे बांधकाम करणे तसेच म्हाडा कॉलनी येथे ५ हजार घरांची नवीन वसाहत तयार करण्याबाबत**

**(४२) ४९६९६ (०३-०५-२०१६). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा मौजे (अमरावती) सर्व्हे क्र. ८६/- व ८७ मधील मंजूर असलेल्या गाळे बांधकाम करणे, म्हाडा कॉलनी बडनेरा या ठिकाणी ५ हजार घरांची नवीन वसाहत तयार करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाचे गृहनिर्माण विभाग मंत्रालय पत्र क्र. ७८/ दिनांक ०४ एप्रिल, २०१५ रोजी च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व), मुंबई अधिकारी म्हाडा अमरावती यांचेकडून मागविण्यात आला असून अद्यापपर्यंत शासन स्तरावरुन कार्यारंभ आदेश व कामासाठी निधी मंजूर झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कधीपर्यंत या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे व तसेच या कामांची किमंत किती आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंडपिंपरी व पोंभुर्णा (जि. गडचिरोली) तालुक्यातील विविध रेती घाटांवरून रेतीची आंध्रप्रदेशात वाहतुक करतांना १३ ट्रक जप्त करण्यात आल्याबाबत**

**(४३) ५०१३४ (२४-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिंपरी व पोंभुर्णा (जि.गडचिरोली) तालुक्यातील विविध रेती घाटांवरून दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास रेतीची आंध्रप्रदेशात वाहतुक करतांना १३ ट्रक जप्त करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली आहे, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.

दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यासुमारास चंद्रपूर जिल्ह्यातील गोडपिंपरी व पोंभुर्णा तालुक्यातील विविध रेती घाटावरुन रेतीची आंध्रप्रदेशात वाहतुक करताना १३ ट्रक जप्त करण्यात आली अशी कोणतीही घटना घडलेली नाही किंवा ट्रक जप्त करण्याबाबतची कार्यवाही सुध्दा करण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूरहून चंद्रपूर शहरात येणारा सुगंधित तंबाखूचा मोठा साठा जप्त करण्यात आल्याबाबत**

**(४४) ५०१३६ (२४-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरहून चंद्रपूर शहरात येणारा सुगंधित तंबाखूचा मोठा साठा स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१६)** :(१) होय.

(२) सदर प्रकरणी चंद्रपूर येथील गंज वार्ड मधील नॅशनल ट्रान्सपोर्ट चे मालक यांचे गोडावून व ट्रक मधून जेन मजा, हुक्का शिशा तंबाखु, ईगल हुक्का असा एकूण २१,१६,२००/- रु. चा माल

जप्त करण्यात आलेला असून पोलीस स्टेशन चंद्रपूर येथे अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ तसेच भा.दं.वि. कलम १८८,२७३,१०९ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आसला आहे. सदर गुन्ह्यासंदर्भात एकूण ६ आरोपींना अटक झालेली असून गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिवती (जि.चंद्रपूर) रस्त्याच्या कामाकरीता अवैध उत्खनन केलेल्या गिट्टीचा ट्रॅक्टर जप्त करुन कंत्राटदारास केलेली अटक

**(४५) ५०२०३ (२४-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) रस्त्याच्या कामाकरीता अवैध उत्खनन केलेल्या गिट्टीचा ट्रॅक्टर जप्त करुन कंत्राटदारांस दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अपंगांच्या रोजगार स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता म्हाडाने राखीव ठेवलेल्या भूखंडाबाबत

**(४६) ५०२४१ (०५-०५-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंगांच्या रोजगार स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता म्हाडाने राखीव ठेवलेल्या आणि पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतराकरिता प्रस्तावित असलेल्या सर्वे नं. १० ब, १४ अ, २५ ब, गोल्फ क्लब रस्ता येरवडा पुणे-६ या जागा उपलब्ध होण्याबाबत प्रहर अपंग क्रांती आंदोलन पुणे शाखा यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी पत्र लिहून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०७-२०१६) :**(१) स.क्र. १० ब, १४अ, १६अ, १७ब, १८ब, २५ब, गोल्फ क्लब रोड, येथील पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मंजूर अभिन्यासातील खुली जागा, क्षेत्र ३२५.६४ चौ.मी. मा.आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, प्रहार संस्थापक यांनी त्यांचे दि.०५.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये अपंगांच्या स्वयंरोजगार आणि प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता,

प्रहार अपंग क्रांती आंदोलन पुणे शाखा यांना उपलबध करावी, अशी मागणी केलेली आहे.
(२) व (३) प्रस्तुत मागणी केलेली जागा ही, मंजूर अभिन्यासातील नियमानुसार सोडावी लागणारी खुली जागा आहे. अशा खुल्या जागा एखाद्या व्यक्तीस/संस्थेस वितरीत करता येत नाहीत. यास्तव मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी स.क्र.१०ब, १४अ, १६अ, १७ब, १८ब, २५ब, गोल्फ क्लब रोड, येथील भूखंड (खुली जागा) म्हाडा अधिनियम, १९७६ चे कलम ६१(२) व (३) नुसार म्हाडाचे अभिन्यासातील सदर विकसन व पुढील देखभालीकरीता पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना कळविले आहे.

---

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ३१८ मध्ये बांधण्यात आलेली मार्केट इमारत गेली ५ वर्षे वापराविना पडून असल्याबाबत**

**(४७) ५०८५२ (०७-०५-२०१६). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ३१८ मध्ये बांधण्यात आलेली मार्केट इमारत गेली ५ वर्षे वापराविना पडून असून सदर इमारतीत गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीची दुरावस्था दुर करुन मार्केट सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :**(१) मिरा-भाईंदर महागरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार सदर मार्केट इमारत समावेशक आरक्षणाच्या तरतूदीतून बांधण्यात आली असून, ही इमारत दि.०५/०१/२०१३ रोजी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.
या इमारतीत गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले नसल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी नमूद केले आहे.
(२) सद्यस्थितीत मुख्या वस्ती जवळील रस्त्यावरच बाजार भरत आहे. नवीन मार्केटची इमारत मुख्य वस्तीपासून लांब असल्याने नवीन मार्केटच्या इमारतीत व्यवसाय होणार नाही, या भितीपोटी विक्रेते त्याठिकाणी स्थलांतरीत होण्यास राजी नाहीत.
यावर उपाययोजना म्हणून महानगरपालिकेकडून सदर भागातील रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांना हटवून त्यांना नवीन मार्केटच्या ठिकाणी बसण्यास राजी करुन घेऊन सदर मार्केटची इमारत लवकरच सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे येथील खान्देश रहेवर पावरलुम कारखान्यातील मजूरांच्या मजूरीत वाढ करण्याबाबत**

**(४८) ५१०५६ (२७-०४-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील खान्देश रहेवर पावरलुम कारखान्यातील मजूरांच्या मजूरीत वाढ व्हावी यासाठी मा.कामगार अधिकारी, धुळे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हस्तक्षेप करुन कारखान्यातील मजूरांना मजूरीत वाढ करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१८-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) संघटनेच्या दि.३१/१०/२०१५ रोजीच्या निवेदनावर दि.०१/१२/२०१५ व दि.२१/१२/२०१५ रोजी सरकारी कामगार अधिकारी, धुळे यांच्या कार्यालयात संघटनेच्या निवेदनाच्या अनुषंगाने चर्चा होऊन तडजोड झाली असून, रंगीन नऊवार साडी बनविण्यासाठी पुर्वीच्या मजूरीच्या दरात रुपये ४.५० (प्रतिनग) व पुढील प्रत्येक वाराला ५० पैसे प्रमाणे यंत्रमाग मालकाने मजूरीच्या दरात वाढ दि.०१ जानेवारी, २०१६ पासून लागू करावी असे ठरले व ते उभयपक्षांनी मान्य केले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाने नियुक्तीने शहरात विविध ठिकाणी कार्यरत असलेले महा-ई सेवा केंद्रे सध्या नागरिकांची आर्थिक फसवणूक करीत असल्याबाबत**

**(४९) ५२९८५ (२१-०४-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाने नियुक्तीने शहरात विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या महा-ई सेवा केंद्रात सध्या नागरिकांची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालय व महापालिका यांच्या माध्यमातून नागरिकांना मोफत आधारकार्ड काढून न देता त्याच्याकडून शंभर रुपये घेऊन आधारकार्ड देवून महा-ई केंद्रा चालकाकडून नागरिकांची आर्थिक फसवणूक होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आह काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने फसवणूक करणाऱ्या महाई केंद्र चालकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६)** :(१) होय.

(२), (३), (४) व (५) या प्रकरणी चौकशी अंती सोलापूर जिल्ह्यात ६ आधार केंद्र चालकांद्वारे नागरिकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्या ६ ऑपरेटराना १० वर्षाकरिता काळ्या यादीत टाकण्याची कारवाई केली आहे.

---

## चंद्रपूर जिल्हयात दोन अल्पवयीन मुलीवर झालेल्या सामुहिक बलत्काराची चौकशी करण्याबाबत

**(५०) ५३०१६ (२०-०५-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंढरी (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) येथील एका खाजगी शाळेत शिक्षण घेणा-या दोन अल्पवयीन शाळकरी मुली गावातीलच एका ओळखीच्या मित्रासोबत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१६ रोजी चिमूर येथे यात्रा बघण्यासाठी मोटर सायकलने जात असतांना मित्राने वाटेत एका मुलीवर बलात्कार करुन नंतर तीन मित्रांना बोलावून त्याच्यासह सदर मुलींवर पुन्हा सामुहिक बलात्कार केल्याचे माहे दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची तक्रार चिमूर पोलीस ठाण्यामध्ये पिडीताच्या पालकांनी केल्यानंतर सुध्दा पोलीसांनी थातूरमातूर चौकशी करून आरोपींना अभय देण्याचा प्रयत्न करीत बाहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून आरोपीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६)** :(१) होय.

तथापि, दोन मुलीवरील बलात्काराचे दोन्ही गुन्हे दि.२०.०२.२०१६ रोजी घडलेले आहेत.

(२) नाही.

(३) सदर प्रकरणी दोन गुन्हे दखल करण्यात आले आहे. दोन मुलीवरील बलात्काराची दोन्ही गुन्हे दि.२०.२.२०१६ रोजी घडले आहेत. पहिल्या फिर्यादी मुलीने तीचेवर बलात्कार झाल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी विरुध्द पोलीस ठाणे चिमूर अप क्र.६७/१६ कलम ३७६(२)(आय)(एन), ५०६, भा.दं.वि. सह कलम ४, १२ लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ प्रमाणे दि.२९.०२.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपी विधी संघर्ष ग्रस्त बालकास अटक करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

दुसऱ्या फिर्यादी मुलीने तीचेवर बलात्कार झाल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन गुन्ह्यातील तीन आरोपी विरुध्द पोलीस ठाणे चिमूर अप क्र.७०/२०१६ कलम ३७६ (७२)(आय), ३५४(अ), ३४ भा.दं.वि. सहकलम ४, ८, १२ पास्को प्रमाणे दि.२९.०२.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील तीनही आरोपींना अटक करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.